# पेप्सीकोचे यंगिस्तानसाठी आगळेवेगळे राष्ट्रगीत




पुणे : मराठमोळ्या भाषेत तुमच्या स्वत:ची ओळख सांगणारं गाणं तुम्ही कधी ऐकलं आहे का? असे गीत की जे अगदी तुम्हाला स्वत:चं वाटावं...ज्यात स्वत :चं प्रतिबिंब उमटावं...जे ऐकल्याने आश्चर्याचा सुखद अनुभव मिळावा..होय असे तरुणाईचे नवे गीत तुम्हाला आता ऐकायला मिळणार आहे.

तरुणाईचे यंगिस्तानचे असे नवे गीत पेप्सीने त्यांच्या अभिनव प्रसारमोहिमेत सादर केले. ते यंगिस्तानचे राष्ट्रगीतच म्हणावे लागेल.यंगिस्तान का वॉव अशा काव्यपंक्तींनी सजविलेल्या या गीताला संगीत दिले आहे विशाल आणि शेखर या लोकप्रिय संगीतकारांनी. यंगिस्तानच्या या गीतासाठी आयोजित केलेल्या संगीत रजनींच्या महाअंतिम फेरीत वॉव या शब्दाचा मधूर वाणीने उच्चार करणाऱ्या स्पर्धकांनी रंग भरला.

युवकांना शब्द वाक्‌प्रचार आणि म्हणींच्या आधारे सादरीकरण करण्याची संधी त्यांना देण्यात आली. यंगिस्तान का वॉव ही त्यांची मूळ संकल्पना होती. या मोहिमेला हजारो युवकांनी भरभरून प्रतिसाद दिला. यंगिस्तानच्या गीतरचनेतच नव्हे तर त्याच्या संगीत निर्मितीतही ते सामील झाले. स्वत:च तयार केलेले हे युवागीत स्फुर्ती देणारे राष्ट्रगीत विशाल आणि शेखर या संगीतकारांसमवेत ऐकताना हे युवक भारावून गेले.

पेप्सीच्या या अभिनव उपक्रमाबद्दल बोलताना कोला पेप्सीको इंडियाच्या मार्केटिंग विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष संदीप सिंग अरोरा म्हणाले की, यंगिस्तान का वॉव हा युवकांचा आवाज आहे. त्यात युवकांची कल्पकता, नाविन्यपूर्ण संकल्पना, त्यांची मते, त्यांचा स्वभाव, त्यांचे ज्ञान आणि हालचाली याचे प्रतिबिंब उमटले आहे.

देशभरातील तरुणांच्या नसानसात भिनलेले ते एक महान काव्य आहे. तरुणांना प्रेरणा देणारे हे गाणे प्रत्येक तरुण गुणगुणताना दिसतो आहे. हजारो स्पर्धकांनी भाग घेऊन पेप्सीच्या ब्रॅण्डवर आपला नितांत विश्वास असल्याचे दाखवून दिले आहे. त्यांनी सादर केलेल्या भावना याच पेप्सीच्याही भावना आहेत.

**नवी दिल्ली :** विरोधी पक्षांनी प्रखर विरोध केल्याने संपुआ सरकारला संसदेत महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्यात अपयश आहे.